| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | – | १२.०८.२०२४ | | |
| नोंदणी तारीख | – | १२.०८.२०२४ | | |
| निकाल तारीख | – | ०५.१२.२०२४ | | |
| कालावधी | – | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०० | ०३ | २४ |

## न्यायाधीश, सहकार न्यायालय, औरंगाबाद यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी एस. ए. शेंडगे)

**सी.सी.ए. क्रमांक – ८७/२०२४**
**निशाणी क्रमांक – २१**

जय मल्हार नागरी सहकारी पतसंस्था लि..
शाखा मुकुंदवाडी ता.जि.औरंगाबाद ,
तर्फे श्री. जगन्नाथ पांडुरंग सोनलकर,
वय ३४ वर्ष, धंदा – नौकरी,
राहणार मुकुंदवाडी औरंगाबाद. – वादी

**विरुध्द**

१. परमेश्वर लक्ष्मण डोईफोडे,
वय ५८ वर्ष, धंदा – शेती,
राहणार भार्डी, पो. हिवरा,
ता. अंबड, जि.औरंगाबाद.

२. कचरु सुर्यभान धवने,
वय ५३ वर्ष, धंदा – व्यवसाय,
राहणार प्लॉट नं.५, तिरुपती कॉलनी, मल्हार चौक,
गारखेडा परिसर, औरंगाबाद,
ता.जि.औरंगाबाद .

३. भगवान लक्ष्मण डोईफोडे,
वय ४९ वर्ष, धंदा – शेती,

राहणार भार्डी, पो. हिवरा,
ता. अंबड, जि.औरंगाबाद. – प्रतिवादी

**दावा कर्जाची रक्कम रुपये २,२९,३८३/– वसुल करुन मिळणेबाबत.**

**वादीतर्फे विधीज्ञ** – श्री. अंबादास अजिनाथ कावरे
**प्रतिवादीतर्फे विधिज्ञ** – एकतर्फा

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०५ डिसेंबर २०२४)

विवाद करणार यांनी कर्जदार व जामिनदार यांच्याकडून थकीत कर्ज रक्कम व्याजासह वसुल होणेसाठी प्रस्तुतचा विवाद दाखल केलेला आहे.

२. **विवाद करणार यांची कथने थोडक्यात खालीलप्रमाणे** –

वादी जय मल्हार नागरी सहकारी पतसंस्था लि.शाखा मुकुंदवाडी ता.जि.औरंगाबाद ही सन १९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अन्वये नोंदणीकृत आहे. पतसंस्थेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. जगन्नाथ पांडुरंग सोनलकर यांना पतसंस्थेच्या वतीने कर्ज संबंधी कामकाज पाहण्यासाठी अधिकारपत्र देण्यात आलेले आहे. प्रतिवादी हे वादी पतसंस्थेचे सभासद व भागधारक आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना पैश्याची आवश्यकता असल्याने प्रतिवादी क्र.१ यांनी वादी पतसंस्था, येथे कर्ज मागणी अर्ज केला. प्रतिवादी क्र.१ यांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन वादी पतसंस्थेने प्रतिवादी क्र.१ यांना रक्कम रुपये ८०,०००/– चे कर्ज द.सा.द.शे १४ टक्के व्याज दराने दिले होती. प्रतिवादी क्र.२ व ३ हे जामिनदार असुन सदर कर्जाच्या परतफेडीस वैयक्तिक तसेच सामुहिकरित्या जबाबदार आहेत.

३. प्रतिवादी क्र.१ कर्जदार तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ जामिनदार यांनी करारनाम्याप्रमाणे व कर्जासंबंधीच्या नियम व अटीप्रमाणे सदर कर्ज रक्कमेची परतफेड केलेली नाही म्हणून प्रतिवादीचे कर्ज खाते थकीत झालेले आहे. दिनांक ०१.०६.२०२४ अखेर कर्जखात्यात प्रतिवादींकडून कर्ज रक्कम रु.२,२९,३८३/– व सदर कर्ज रक्कमेवर दि.०१.०६.२०२४ पासुन प्रतिवादींकडुन संपूर्णपणे परतफेड होईपर्यंत व्याज १४ टक्के

द.सा.द.से. या दराप्रमाणे व्याजासह होणारी एकूण कर्ज रक्कम प्रतिवादी यांनी वादी पतसंस्थेस देणे बाकी आहे. दिनांक १०.०६.२०२४ रोजी पतसंस्थेच्या विधीज्ञांमार्फत प्रतिवादी यांना आर.पी.ए.डी. व्दारे नोटीस पाठवून थकीत कर्जाची मागणी केली असता प्रतिवादी यांनी थकीत कर्जाची परतफेड करण्यास टाळाटाळ केली आहे. सबब, प्रस्तुतचा दावा वादी पतसंस्थेने प्रतिवादींकडून थकीत कर्जावरील रक्कम व्याजासह वसुल होणेसाठी दाखल केला आहे.

४. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांना निशाणी ७,८ व ९ प्रमाणे समन्सची बजावणी होवून देखील ते न्यायालयात हजर झालेले नाहीत. दिनांक ११.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचेविरुध्द प्रस्तुतचा दावा एकतर्फा चालविण्यात आला.

५. वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादकथनावरुन, खालील वादप्रश्न उपस्थित होत असून, त्यावरील निष्कर्ष व त्याबाबतची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी पतसंस्था यांनी प्रतिवादी क्रमांक १ यांना रक्कम रुपये रु. ८०,०००/- चे कर्ज दिले होते हे वादी पतसंस्था शाबीत करते काय ? | नाही |
| २ | वादी पतसंस्था यांना प्रतिवादी कडून रक्कम रुपये २,२९,३८३/- येणे आहे हे वादी संस्था शाबीत करते काय ? | नाही |
| ३ | वादी पतसंस्थेने मागणी केलेप्रमाणे कर्जाची रक्कम व व्याज मिळणेस वादी पतसंस्था पात्र आहे काय ? | नाही |
| ४ | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |

६. वादी पतसंस्थाने खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले.

| अ.नं. | साक्षीदाराचे नांव | निशाणी नंबर | साक्षीदाराची भूमिका |
|---|---|---|---|
| १ | जगन्नाथ पांडुरंग सोनाळकर | ११ | अधिकारपत्र धारक |

७. वादीने खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली.

| अ.क्र | कागदाचे वर्णन | निशाणी क्रमांक | तारिख |
|---|---|---|---|
| १ | पतसंस्थेचा ठराव क्र.८ ची सत्यप्रत | १२ | १९.११.२०२२ |
| २ | कर्ज मागणी अर्ज | १३ | – |
| ३ | कर्ज मंजुरी शिफारस | १४ | – |
| ४ | वचनचिठ्ठी (जॉइंट अँड सेवरल करारनामा) | १५ | ०१.०६.२०१३ |
| ५ | करारनामा | १६ | – |
| ६ | विधीज्ञांमार्फत पाठवलेली नोटीस. | १८ | १०.०६.२०२४ |
| ७ | पोस्टाची पावती | १९ | १०.०६.२०२४ |
| ८ | कर्जदाराचा कर्ज खाते उतारा. | १७ | २०१६ –२०२४ |
| ९ | वादीतर्फे पुरावा बंद पुरसिस | २० | २२.११.२०२४ |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ बाबत –**

८. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींकडून कर्जाची रक्कम अधिक व्याज वसूल होवून मिळण्याकरीता केलेला आहे. वादी यांनी जगन्नाथ पांडुरंग सोनाळकर (वादी साक्षीदार क्रमांक १) यांचे निशाणी क्रमांक ११ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर सरतपासामध्ये साक्षीदाराने दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. वादी यांचे कथनांनुसार प्रतिवादी हे वादी पतसंस्थेचे सभासद व भागधारक आहेत व प्रतिवादी क्रमांक

१ यांनी कर्ज मागणी अर्ज (निशाणी १३) सादर करुन कर्ज मिळावे अशी मागणी केली आहे. वादी यांनी अभिलेखावर निशाणी क्रमांक १३ वर प्रतिवादी यांनी वादी पतसंस्थेकडे कर्ज मागणीसाठी केलेल्या अर्जाची मुळ प्रत दाखल केली आहे. तसेच, निशाणी १४ वर कर्ज मंजूरी पत्र दाखल केले आहे. वादी यांनी अभिलेखावर कर्जाबाबतची सर्व कागदपत्रे निशाणी १५ ते १६ वर सादर केली आहेत, सदर सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, कर्ज मंजुरी शिफारसीवर व्यवस्थापक, सचिव, अथवा अध्यक्ष यांची सही नाही. तसेच सदर कागदपत्रांसोबत स्टॅम्प जोडल्याचे दिसून येत नाही. कर्ज कागदपत्रांना कायदेशीर मान्यता मिळण्यासाठी आणि वैधतेसाठी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. वर नमूद केले प्रमाणे वादी संस्थेने कोणताही स्टॅम्प कागदपत्रांना लावल्याचे दिसून येत नाही. सबब सदरील कागदपत्रे पुराव्यात वाचता येणार नाहीत. वादी यांच्या कथानांनुसार त्यांनी प्रतिवादी यांना कर्ज दिलेले आहे, सबब वादी यांनी सदर बाब शाबीत करण्याकरिता इतर कोणता पुरावा सादर केला आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांनी वर नमूद पुराव्याव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा सादर केलेला नाही, सबब केवळ वादी म्हणतो म्हणून प्रतिवादी हे वादी पतसंस्थेचे सभासद व भागधारक आहेत व प्रतिवादी यांना कर्ज दिले ही बाब गृहीत धरणे न्यायोचित नाही. सबब मी वादप्रश्न क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्रमांक २ व ३ बाबत –**

९. वादी पतसंस्थेचे अधिकारपत्र धारक जगन्नाथ पाडुरंग सोनाळकर (साक्षीदार क्रमांक) यांनी निशाणी क्रमांक ११ वर सरतपासात असे कथन केले आहे की, वादी पतसंस्थेला प्रतिवादींकडून रक्कम रुपये २,२९,३८३/– येणे बाकी आहे. वर कथन केले प्रमाणे वादी यांनी प्रतिवादी हे वादी पतसंस्थेचे सभासद व भागधारक आहेत व प्रतिवादी क्रमांक १ यांना कर्ज दिले ही बाब योग्य पुरावा देऊन शाबीत केलेली नाही. सबब कोणतेही कर्ज दिल्याचे सिद्ध न झाल्याने प्रतिवादी कडून रक्कम रुपये २,२९,३८३/– येणे आहे किंवा कसे हे विचारात घेता येणार नाही.

१०. सबब वादी हे प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचेकडून संपूर्ण कर्जाची रक्कम म्हणजेच २,२९,३८३/– रुपये वसूल होवून मिळण्यासाठी पात्र आहेत हे वादीने सिध्द केलेले नाही. सबब प्रतिवादी यांचे विरुद्ध कोणताही आदेश पारित करणे न्यायोचित नाही. सबब मी वाद प्रश्न क्रमांक २ व ३ बाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व वादप्रश्न क्रमांक ४ बाबत

खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. विवाद खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात वाचून घोषीत करण्यात आला.)

५/१२/२४

ठिकाण – औरंगाबाद
दिनांक – ०५.१२.२०२४.

(सायली अशोक शेंडगे MH03123)
न्यायाधीश, सहकार न्यायालय औरंगाबाद